संक्षिप्त

दहशतवाद्यांशी संबंधांचा संशय, कर्मचारी बडतर्फ

श्रीनगर : दहशतवाद्यांशी कथित संबंधांच्या संशयावरून जम्मू-काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी गुरुवारी दोन सरकारी कर्मचाऱ्यांना बडतर्फ केल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. लष्कर-ए-तैयबा (एलईटी) संघटनेच्या कारवायांना पाठिंबा देण्यात सक्रिय सहभागी असल्याचे आढळून आलेले शिक्षक गुलाम हुसेन आणि माजिद इक्बाल दार यांच्या सेवा बडतर्फ करण्यात आल्या, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. गेल्या पाच वर्षांत सिन्हा यांच्या नेतृत्वाखालील प्रशासनाने संविधानाच्या कलम ३११ चा वापर करून आतापर्यंत सुमारे ८० सरकारी कर्मचाऱ्यांना बडतर्फ केले आहे. हुसेनला 'ओव्हरग्राउंड वर्कर' (ओजीडब्ल्यू) म्हणून रियासी आणि आसपासच्या भागात दहशतवादी जाळे मजबूत करण्याचे काम देण्यात आले होते, तो दहशतवादी मोहम्मद कासिम आणि गुलाम मुस्तफा यांच्या संपर्कात होता. तर दार याचे दहशतवादी मोद जबारशी जवळचे संबंध होते, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

रशियाचे युक्रेनमध्ये स्फोट; वीजपुरवठा खंडित

कीव : रशियाने ऊर्जा पायाभूत सुविधांवर मोठ्या प्रमाणात ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ले केल्यामुळे गुरुवारी युक्रेनमधील वीजपुरवठा खंडित झाला. युक्रेनच्या पंतप्रधानांनी रशियाच्या या हल्ल्याचे वर्णन पद्धतशीर ऊर्जा दहशत असे केले आहे. थंडीचा कडाका वाढत असताना, रशिया युक्रेनच्या वीज पायाभूत सुविधांवर सतत हल्ले करत आहे. या हल्ल्यांमध्ये ७ वर्षांच्या मुलीसह किमान सहा जणांचा मृत्यू तर १८ जखमी झाले आहेत. रशियाने हल्ल्यात ६५० हून अधिक ड्रोन आणि विविध प्रकारच्या ५० हून अधिक क्षेपणास्त्रे डागली, असे युक्रेनचे अध्यक्ष लोदिमिर झेलेन्स्की यांनी सांगितले. 'या दहशतीला रोखण्यासाठी युक्रेनला अधिक हवाई संरक्षण प्रणाली, कठोर निर्बंध आणि रशियावर जास्तीत जास्त दबाव आवश्यक आहे,' असे युक्रेनच्या पंतप्रधान युलिया स्वेरीडेन्को म्हणाल्या.

चीनवरील करात अमेरिकेची कपात

ट्रम्प-जिनपिंग यांची दक्षिण कोरियात भेट, चीनकडूनही दुर्मीळ खनिजांची निर्यात सुरू

वृत्तसंस्था, बुसान

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांची गुरुवारी दक्षिण कोरिया येथे घेतलेली भेट अतिशय यशस्वी झाल्याचे म्हटले आहे. अमेरिका चीनवरील करात कपात करणार असून, चीनही दुर्मीळ खनिजांच्या निर्यातीवरील निर्बंध शिथिल करणार आहे. चीनबरोबर लवकरच व्यापार करार केला जाईल, असे ते म्हणाले.

जिनपिंग आणि ट्रम्प यांच्यात १०० मिनिटे चर्चा झाली. दक्षिण कोरियातील बुसान येथे दोन्ही नेते एकमेकांना भेटले. याच ठिकाणी आशिया पॅसिफिक आर्थिक सहकार्य शिखर परिषद झाली. भेटीनंतर ट्रम्प अमेरिकेला रवाना झाले. ट्रम्प म्हणाले, 'अमेरिकेने चीनवर लागू केलेला कर १० टक्क्यांनी कमी केला जाईल. फेंटानिल तयार करण्यासाठी, रसायन विकण्यासाठी दंड म्हणून चीनवर कर लागू केला होता. त्यामुळे चीनवरील एकूण कर ५७ वरून ४७ टक्के इतका होईल.' ट्रम्प यांनी पुढील वर्षी एप्रिलमध्ये चीनला भेट देऊ असे सांगितले, तर जिनपिंगही त्यानंतर कधी तरी अमेरिकेला भेट देतील, असे विधान केले.

जिनपिंग यांनी अमेरिकेबरोबर एकत्र काम करण्याची इच्छा दर्शविली. जिनपिंग म्हणाले, 'दोन्ही देशांतील राष्ट्रीय स्थिती वेगळी असल्याने आपण प्रत्येक वेळी एकमेकांकडे बघू शकत नाही. दोन आघाडीच्या अर्थव्यवस्था असलेल्या देशांमध्ये कायमच थोडे तणाव असतात. ही स्थिती सामान्य आहे.'



'अमेरिकाही करणार अण्वस्त्रचाचण्या'

- अमेरिका तीन दशकांनंतर अण्वस्त्रचाचण्या पुन्हा सुरू करील. रशिया आणि चीनशी समान अशा या चाचण्या असतील, असे विधान ट्रम्प यांनी केले. चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांच्याबरोबरील चर्चेच्या काही मिनिटे आधी सामाजिक माध्यमावर त्यांनी या संदर्भात टिप्पणी केली.
- अमेरिका अण्वस्त्रे डागू शकणाऱ्या क्षेपणास्त्रांची नियमितपणे चाचणी करते. पण, १९९२ पासून अणुचाचणी अमेरिकेने केलेली नाही. ट्रम्प यांनी टिप्पणी केली, 'इतर देश त्यांच्या प्रकल्पांची चाचणी करीत असल्यामुळे मी युद्ध विभागाला समान धर्तीवर अमेरिकेने अण्वस्त्रचाचणी करावी, अशा सूचना दिल्या आहेत. ही प्रक्रिया लगेच सुरू केली जाईल.'

चीनने अमेरिकेचा दावा फेटाळला

बीजिंग : कंबोडिया आणि थायलंडमध्ये शांतता प्रस्थापित करण्यात चीनचा सहभाग नव्हता, असा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गुरुवारी बुसान येथील परिषदेत केलेला दावा चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांनी फेटाळून लावला. गाझा येथील युद्धबंदी कराराबाबत अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रयत्नांचे जिनपिंग यांनी कौतुक केले. तथापि, जिनपिंग यांनी ट्रम्प यांनी चीन कंबोडिया आणि थायलंडमध्ये शांतता प्रस्थापित करण्यात सहभागी नव्हता, असा केलेला दावा फेटाळून लावला. तसेच चीनने आग्नेय आशियातील या शेजारी राष्ट्रांमधील सीमावादावर आपल्या पद्धतीने तोडगा काढला, असे वृत्त हाँगकाँगस्थित 'साउथ चायना मॉर्निंग पोस्ट'ने दिले आहे.

तंत्रज्ञान देणार

गिआंगजू : अणूऊर्जेवर चालणारी पाणबुडी तयार करण्यासाठी अमेरिका दक्षिण कोरियाला तंत्रज्ञान पुरवेल, असे डोनाल्ड ट्रम्प म्हणाले. दक्षिण कोरियाच्या अध्यक्षांची भेट घेतल्यानंतर त्यांनी सामाजिक माध्यमावर पोस्ट केली.

सोयाबीन खरेदी

चीनने कराराचा भाग म्हणून दरवर्षी २५ दशलक्ष मेट्रिक टन अमेरिकन सोयाबीन खरेदी करण्यास सहमती दर्शविली आहे, असे ट्रेझरी सेक्रेटरी स्कॉट बेसेंट यांनी गुरुवारी सांगितले.

अणूऊर्जेवरील पाणबुडीसाठी

काँग्रेस-'राजद'कडून छठ मातेचा अवमान

बिहारमधील सभेत मोदी यांचा आरोप

पीटीआय, छपरा/मझफ्फरपूर

मतपेढी आणि तुष्टीकरणाच्या राजकारणासाठी काँग्रेससह राष्ट्रीय जनता दलाने (राजद) घुसखोरांना संरक्षण दिल्याचा आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी केला. या दोन्ही पक्षांनी छठ मातेचा अपमान तर केलाच, शिवाय तसेच अयोध्येतील राम मंदिराचीही यांना समस्या असल्याचा दावा मोदी यांनी केला.

छठपूजेच्या निमित्ताने यमुनेत स्नान करण्याची योजना आखून मोदींनी 'नाटक' करण्याचा प्रयत्न केला, असा आरोप काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केला होता. त्यावरून मोदी यांनी राहुल यांना गुरुवारी लक्ष्य केले. 'प्रवास करताना मी छठची गाणी ऐकत होतो. नागालँडमधील एका मुलीने सादर केलेले गाणे ऐकून भारावून गेलो. तुमचा हा मुलगा छठला सन्मान मिळावा यासाठी प्रयत्नशील असताना, काँग्रेस-राजदचे लोक या सणाची निंदा करत आहेत,' असा आरोप मोदी यांनी कोणत्याही नेत्याचे नाव न घेता केला.



'हा उत्सव केवळ भक्तीसाठी नाही तर समानतेसाठीही आहे. म्हणूनच माझे सरकार या उत्सवाला 'युनेस्को'चा वारसा दर्जा मिळवण्याचा प्रयत्न करत आहे,' असे मोदी यांनी सांगितले.

बिहारमधून 'इंडिया'चे अस्तित्व संपणार : शहा

काँग्रेस कार्यकर्त्यांसह विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मातोश्रींचा तसेच छठ मातेचा अपमान केला आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीत बिहारमधील जनता याचा बदला घेतील आणि 'इंडिया' आघाडी बिहारमधून नामशेष होईल, असा दावा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी प्रचार सभेत गुरुवारी केला.

चाबहार बंदर प्रकल्पावरील निर्बंधांत सूट

अमेरिकेबरोबर व्यापार कराराबाबत वाटाघाटी सुरू : जैस्वाल

पीटीआय, नवी दिल्ली

इराणमधील चाबहार बंदर प्रकल्पावरील निर्बंधामधून अमेरिकेने भारताला सहा महिन्यांची सूट दिल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाने गुरुवारी दिली. व्यापार कराराबाबत अमेरिकेबरोबर वाटाघाटी करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे सांगण्यात आले. हे निर्बंध २९ सप्टेंबरपासून लागू होणार होते, परंतु दोन्ही बाजूंच्या चर्चेनंतर एक महिन्याची सूट देण्यात आली. नवीन सवलत २९ ऑक्टोबरपासून लागू झाली आहे.

गेल्या महिन्यात, ट्रम्प प्रशासनाने इराणमधील धोरणात्मकदृष्ट्या स्थित असलेल्या चाबहार बंदराबाबत २०१८ ची निर्बंध सूट रद्द करण्याचा निर्णय जाहीर केला होता. इराणच्या दक्षिण किनाऱ्यावरील सिस्तान-बलुचिस्तान प्रांतात असलेल्या चाबहार बंदराच्या विकासात भारत एक प्रमुख भागीदार आहे. सध्या भारत या बंदरावर शाहिद बेहेश्ती टर्मिनल चालवत आहे. चाबहार बंदर चालवणाऱ्या आणि इतर संबंधित कामांमध्ये सहभागी असलेल्या भारताला २९ सप्टेंबरपासून 'यूएस इराण फ्रीडम अँड काउंटर-प्रोलिफरेशन ॲक्ट' (आयएफसीए) अंतर्गत निर्बंधांना सामोरे जावे लागेल, असे अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाने गेल्या महिन्यात म्हटले होते.

अमेरिकन निर्बंधांच्या परिणामांचा अभ्यास

इंधन सुरक्षेचा विचार करूनच भारत विविध स्रोतांतून परवडणाऱ्या किमतीत कच्च्या तेलाची खरेदी करत आहे आणि अमेरिकेने रशियन तेल कंपन्यांवर लादलेल्या निर्बंधांमुळे भारताच्या या धोरणावर काय परिणाम होईल, याचा अभ्यास केला जात असल्याची माहिती रणधीर जैस्वाल यांनी दिली. निर्बंधानंतर भारतीय कंपन्या आता रशियाच्या सवलतीतील कच्च्या तेलाची आयात कमी करून अमेरिकेकडून आयात करण्याच्या विचारात आहे.

भारत अफगाणिस्तानच्या सार्वभौमत्वासाठी कटिबद्ध



अफगाणिस्तानचे सार्वभौमत्व, स्वातंत्र्य आणि प्रादेशिक अखंडतेसाठी कटिबद्ध असल्याचे भारताने म्हटले आहे. अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारताने गुरुवारी आपली भूमिका स्पष्ट केली. अफगाणिस्तान आपल्या भूभागावर सार्वभौमत्वाचा वापर करत आहे यावरून पाकिस्तान नाराज आहे. पाकिस्तानला वाटते की कोणत्याही शिक्षेविना सीमापार दहशतवाद चालविण्याचा त्यांना अधिकार आहे, अशी टीका परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी केली. तथापि, शेजारील देशांना हे मान्य नाही, असे ते म्हणाले.

अमेरिकेतील परवान्यांचे स्वयंचलित नूतनीकरण बंद

पीटीआय वॉशिंग्टन

अमेरिकेने एच-१बी व्हिसावरील शुल्क एक लाख अमेरिकी डॉलर केल्यानंतर आता परदेशी कर्मचाऱ्यांना कामासाठी दिलेल्या परवान्यांचे स्वयंचलित पद्धतीने होणारे नूतनीकरण थांबविण्याचा निर्णय घेतला आहे. अमेरिकेत कामासाठी गेलेल्या स्थलांतरित भारतीय कर्मचाऱ्यांना याचा मोठा फटका बसणार आहे.

अमेरिकेत स्थलांतराला आळा घालण्यासाठी गृह सुरक्षा विभागाने बुधवारी ही घोषणा केली. नूतनीकरणापूर्वी परदेशी कर्मचाऱ्यांची योग्य पद्धतीने तपासणी केली जाणार आहे. ३० ऑक्टोबर २०२५ नंतर जे परदेशी कर्मचारी नूतनीकरणासाठी अर्ज करतील, त्यांचे कामासाठीचे परवाने आपोआप अद्ययावत होणार नाहीत. त्यासाठी कर्मचाऱ्यांना स्क्रीनिंग आणि इतर टप्प्यांतून जावे लागणार आहे. अमेरिकेत काम करण्याची संधी मिळणे, हा हक्क नाही, असे नागरिकत्व आणि स्थलांतरित विभागाचे संचालक जोसेफ एडलो यांनी सांगितले.

यापूर्वी अमेरिकेने एच-१बी नव्याने अर्ज करणाऱ्यांना एक लाख डॉलर शुल्क आकारण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचाही मोठा फटका विविध कंपन्यांना आणि नव्याने अर्ज करणाऱ्यांना बसला आहे.

'मेलिसा' चक्रीवादळाचा फटका




हैती, क्युबा आणि जमाईका या तीन देशांना मेलिसा चक्रीवादळाचा मोठा फटका बसला असून आतापर्यंत ५० लोकांचा त्यात बळी गेल्याचे सांगितले जात आहे. चक्रीवादळाने अनेक घरांचे छप्परे उडाली असून सर्वत्र वीजपुरवठा ठप्प झाल्याचे चित्र आहे. मेलिसा चक्रीवादळाचा सर्वप्रथम फटका जमाईकामधील सेंट एलिझाबेथ शहराला बसला. महामार्गावर दरड कोसळल्याने वाहतूक ठप्प झाली आहे.

भारतीय बनावटीचा 'स्टेंट' अमेरिकेपेक्षा सरस

पीटीआय, सॅन फ्रान्सिस्को

भारतामध्ये तयार करण्यात आलेल्या हृदयासाठीच्या स्टेंटला जागतिक स्तरावर मान्यता प्राप्त झाली आहे. नव्या पिढीचे हे 'हार्ट स्टेंट'चा अतिजोखमीच्या रुग्णांमध्ये अपयशी ठरण्याचा दर अमेरिकेत उत्पादित झालेल्या 'स्टेंट' पेक्षा कमी ठरला आहे.

हृदयविकार तज्ज्ञांची जागतिक परिषद येथे बुधवारी पार पडली. भारतातील हृदयविकारतज्ज्ञ डॉ. उपेंद्र कौल यांनी भारतातील 'टुक्सेडो-२' चाचणीचा परिणाम सादर केला.



यामध्ये भारतीय बनावटीचा 'स्टेंट' 'सुपरफ्लेक्स क्रुझ'ची तुलना अमेरिकेतील 'क्षिएन्स'शी करण्यात आली. ही चाचणी भारतामधील ६६ केंद्रांमध्ये करण्यात आली. मधुमेह आणि इतर सहव्याधी असणाऱ्या अतिजोखमीच्या रुग्णांवर चाचणीमध्ये विशेष लक्ष होते. या चाचणीचे परिणाम अतिशय उत्साहवर्धक आले आहेत.

भारतीय बनावटीचा हा स्टेंट प्रस्थापित आंतरराष्ट्रीय दर्जापेक्षा जराही कमी नाही. या चाचणीमध्ये स्टेंट अपयशी ठरण्याचा दर (टीएलएफ) कमी ठरला आहे. सुरतमधील कंपनीने या स्टेंटची निर्मिती केली आहे. स्टेंट लावल्यानंतर वर्षभरामध्ये हृदयविकाराचा झटका बसण्याचेही प्रमाण कमी झाल्याचे चाचणीमध्ये दिसले आहे. भारतीय वैद्यकीय साधनाच्या या उपलब्धीचे परिषदेमध्ये कौतुक करण्यात आल्याचे डॉ. कौल यांनी सांगितले.

मल्टी कमॉडिटी एक्सचेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेड

एक्स्चेंज स्क्वेअर, सुरेन रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०९३, भारत
सीआयएन: U74999MH2008PLC185349 | ई-मेल: ig-mcxccl@mcxccl.com | संकेतस्थळ: www.mcxccl.com

३० सप्टेंबर २०२५ रोजी संपलेल्या त्रैमासिक व सहामाही अलेखापरीक्षित आर्थिक निष्कर्षांचे सार

(₹ लाखांमध्ये)

तपशील	संपलेली तिमाही ३० सप्टेंबर, २०२५ अलेखापरीक्षित	संपलेली तिमाही ३० जून, २०२५ अलेखापरीक्षित	संपलेली तिमाही ३० सप्टेंबर, २०२४ अलेखापरीक्षित	संपलेली सहामाही ३० सप्टेंबर, २०२५ अलेखापरीक्षित	संपलेली सहामाही ३० सप्टेंबर, २०२४ अलेखापरीक्षित	संपलेले वर्ष ३१ मार्च, २०२५ लेखापरीक्षित
१.प्रचालनातून एकूण उत्पन्न	६,९२०	७,०५१	६,३५९	१३,९७१	११,७९३	२३,८९७
२.कालावधीकरिता निव्वळ नफा/तोटा (कर, अपवादात्मक व/किंवा असाधारणबाबींपूर्वी)	४,२६५	४,६९३	४,२७२	८,९५८	७,२९६	१४,३३६
३.कालावधीकरिता करापूर्वीचा निव्वळ नफा/तोटा (अपवादात्मक व/किंवा असाधारणबाबींनंतर)	४,२६५	४,६९३	४,२७२	८,९५८	७,२९६	१४,३३६
४.कालावधीकरिता करानंतरचा निव्वळ नफा/तोटा (अपवादात्मक व/किंवा असाधारणबाबींनंतर)	४,२६२	४,६९३	४,२७२	८,९५५	७,२९६	१४,३२७
५.कालावधीकरिता एकूण व्यापक उत्पन्न/तोटा [(कालावधीकरिता सर्वसमावेशक नफा (करानंतर) आणि इतर व्यापक उत्पन्न (करानंतर)]	४,२७४	४,६६३	४,२८५	८,९३७	७,२९८	१४,२९७
६.समभाग भांडवल (₹१०/- प्रति शेअर)	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०
७.राखीव (पुनर्मूल्यांकन निधी वगळून मागील वर्षाच्या लेखापरीक्षित ताळेबंदात दर्शविल्यानुसार)	-	-	-	-	-	(३,९८६)
८.प्रत्येक समभागाचे उत्पन्न (₹१०/- प्रत्येकी)* मूलभूत व सौमिकृत (₹)	१.७८	१.९६	१.७८	३.७३	३.०४	५.९७

* अंतरिम कालावधीसाठी प्रति समभाग उत्पन्न वार्षिकीकृत नाही.

नोंद:

१. वरील तक्ता त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे सार आहे. त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे पूर्ण स्वरूप कंपनीचे संकेतस्थळ www.mcxccl.com वर उपलब्ध आहे.
२. वरील निष्कर्षांचे पुनरावलोकन दिनांक ३० ऑक्टोबर २०२५ रोजी लेखापरीक्षा समितीकडून केले गेले आहे आणि दिनांक ३० ऑक्टोबर २०२५ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत त्यांना मान्यता मिळाली आहे.

संपूर्ण वित्तीय निष्कर्ष पाहण्यासाठी क्युआर कोड स्कॅन करा.
किंवा https://www.mcxccl.com/disclosures/financial-results ला भेट द्या.

स्थळ: मुंबई
दिनांक: ३० ऑक्टोबर २०२५

मल्टी कमॉडिटी एक्सचेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेडकरिता
स्वाक्षरी/-
नरेंद्र कुमार अहलावत
व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी

SAINT-GOBAIN

ग्राइंडवेल नॉर्टन लि.

360 YEARS YOUNG MAKING THE WORLD A BETTER HOME

नोंदणीकृत कार्यालय: लीला बिझनेस पार्क, लेव्हल ५, अंधेरी-कुर्ला रोड, मरोळ, अंधेरी (पू), मुंबई ४०० ०५९.
टेलिफोन: ०२२-४०२१२१२१, फॅक्स: ०२२-४०२१२१०२, इमेल: sharecmpt.gno@saint-gobain.com,
वेबसाइट www.grindwellnorton.co.in, सी आय एन - L26593MH1950PLC008163

३० सप्टेंबर, २०२५ रोजी समाप्त तिमाही आणि सहामाहीसाठी अलेखापरिक्षित एकत्रित आर्थिक निष्कर्षांचा गोषवारा

(₹ लाखांत)

अनु. क्र.	तपशील	३०-०९-२०२५ रोजी समाप्त तिमाहीसाठी (अलेखापरिक्षित)	३०-०९-२०२५ रोजी समाप्त सहामाहीसाठी (अलेखापरिक्षित)	३०-०९-२०२४ रोजी समाप्त तिमाहीसाठी (अलेखापरिक्षित)
१	एकूण उत्पन्न	८०,५७३	१,५३,३०१	७१,७२८
२	करोत्तर निव्वळ नफा / (तोटा)	१०,७४३	२०,१८७	९,७०९
३	कालावधीसाठी एकूण व्यापक उत्पन्न [कालावधीसाठी नफा / (तोटा) (करोत्तर) आणि अन्य व्यापक उत्पन्न (करोत्तर) यांचा समावेश करून]	११,५७०	२१,३५४	९,७०९
४	भरणा झालेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹ ५/- प्रत्येकी)	५,५३६	५,५३६	५,५३६
५	मूळ व विरल प्रति शेअर प्राप्ती (असाधारण बाबींच्या आधी) (प्रत्येकी ₹ ५/- च्या) (वार्षिकीकरण न करता)	९.६५	१८.१८	८.६९
६	मूळ व विरल प्रति शेअर प्राप्ती (असाधारण बाबींच्या नंतर) (प्रत्येकी ₹ ५/- च्या) (वार्षिकीकरण न करता)	९.६५	१८.१८	८.६९

३० सप्टेंबर, २०२५ रोजी समाप्त तिमाही आणि सहामाहीसाठीचे कंपनीच्या अलेखापरिक्षित स्वतंत्र आर्थिक निष्कर्षांचे आकडे खालीलप्रमाणे आहेत:

(₹ लाखांत)

अनु. क्र.	तपशील	३०-०९-२०२५ रोजी समाप्त तिमाहीसाठी (अलेखापरिक्षित)	३०-०९-२०२५ रोजी समाप्त सहामाहीसाठी (अलेखापरिक्षित)	३०-०९-२०२४ रोजी समाप्त तिमाहीसाठी (अलेखापरिक्षित)
१	एकूण उत्पन्न	७९,२२१	१,५०,९९०	६९,५३८
२	करपूर्व नफा	१४,०१३	२६,५९३	१२,४४६
३	कालावधीसाठी निव्वळ नफा	१०,५१२	१९,९५१	९,४०४

टीपा:

१. ३० सप्टेंबर २०२५ रोजी समाप्त तिमाही आणि सहामाहीसाठीच्या अलेखापरीक्षित एकत्रित आर्थिक निष्कर्षांचे ("एकत्रित आर्थिक निष्कर्ष"), ३० ऑक्टोबर २०२५ रोजी झालेल्या त्यांच्या संबंधित बैठकांमध्ये लेखापरीक्षकांच्या समितीने पुनरावलोकन केले आहे आणि संचालक मंडळाने मंजूरी दिली आहे. ग्राइंडवेल नॉर्टन लिमिटेड ("कंपनी", "मूल कंपनी") च्या वैधानिक लेखापरीक्षकांनी वरील एकत्रित आर्थिक परिणामांचा मर्यादित आढावा घेतला आहे. हे एकत्रित आर्थिक निष्कर्ष सेबी (सूची दायित्व आणि प्रकटीकरण आवश्यकता, सुधारित केल्याप्रमाणे) नियम, २०१५ च्या नियम ३३ अंतर्गत तयार आणि प्रकाशित केले आहेत..

२. वरील एकत्रित आर्थिक निष्कर्ष Ind AS ११० – 'एकत्रित आर्थिक विवरणा' नुसार तयार केले गेले आहेत. एकत्रित आर्थिक निष्कर्षांमध्ये मूळ कंपनी, तिची उपकंपनी, म्हणजेच सेंट-गोबेन सिरॅमिक मटेरियल्स भूतान प्रायव्हेट लिमिटेड, संयुक्त उपक्रम संस्था, म्हणजेच ॲडव्हान्स्ड सिंथेटिक मिनरल्स प्रायव्हेट लिमिटेड यांचे निष्कर्ष समाविष्ट आहेत. कंपनीकडे क्लीनविन एनर्जी थ्री एलएलपी ही सहयोगी देखील आहे, जेथे कराराच्या अटींनुसार, कंपनी नफा/(तोटा) यापैकी कोणत्याही वाट्यासाठी पात्र नाही. व्यवस्थापनाद्वारे रीतसर प्रमाणित केलेले, ३० सप्टेंबर २०२५ रोजी समाप्त तिमाही आणि सहामाहीसाठीचे, उपकंपनी आणि संयुक्त संस्थांचे अलेखापरीक्षित आर्थिक निष्कर्ष हे एकत्रित आर्थिक निष्कर्ष तयार करतांना विचारात घेतले गेले आहेत.

३. एकत्रित आर्थिक निष्कर्ष बीएसई इंडियाच्या www.bseindia.com या वेबसाइटवर, नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या www.nseindia.com या वेबसाइटवर आणि कंपनीच्या www.grindwellnorton.co.in या वेबसाइटवर उपलब्ध आहेत. खाली दिलेला QR कोड स्कॅन करून ते पाहता येतील.

मुंबई
३० ऑक्टोबर २०२५

ग्राइंडवेल नॉर्टन लिमिटेड साठी
वेणूगोपाल शानभाग
व्यवस्थापकीय संचालक
संचालक ओळख क्र. ०८८८८३५९